वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ८२८२ /२०२३ दिनांक :- १९/११/२०२३

# प्रसिध्दीपत्रक

**विषय :- महालक्ष्मी लॉन्स, खराडी या ठिकाणच्या सभेकरीता व निकम फार्म, संगमवाडी या ठिकाणचे कार्यक्रमाकरीता येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग व्यवस्थेबाबत**

-------oo--------

**अ)** दि. २०/११/२०२३ रोजी महालक्ष्मी लॉन्स, खराडी या ठिकाणी श्री. मनोज जरांगे पाटील यांची सभा होणार असून सदर सभेकरीता मोठया प्रमाणात नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सभेकरीता येणाऱ्या नागरिकांची वाहनांकरीता स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे

- **चारचाकी वाहनांकरीता पार्किंग व्यवस्था**
  १) पुणे शहर, नगर रोड वरुन येणाऱ्या वाहनचालकांनी वाहने ही महालक्ष्मी लॉन्सचे पश्चिम बाजुकडील मोकळया मैदानामध्ये पार्क करावीत.
  २) हडपसर, खराडी परिसरातून येणाऱ्या वाहनचालकांनी वाहने ही खराडी जकातनाका भाजीमंडई समोरील मोकळया जागेमध्ये पार्क करावीत.
- **दुचाकी वाहनांकरीता पार्किंग व्यवस्था**
  १) खराडी जकातनाका भाजी मंडई या ठिकाणी

**ब)** दि. २०/११/२०२३ ते २२/११/२०२३ रोजी दरम्यान निकम फार्म, संगमवाडी पुलाजवळ पटांगण, संगमवाडी, पुणे येथे श्री. बागेश्वर महाराज यांचा 'श्री. हनुमान कथा सत्संग' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाकरीता येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांकरीता खालीलप्रमाणे स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

- **व्ही.आय.पी. / व्ही.व्ही.आय.पी. पार्किंग :-** जाधवराव पार्किंग
- **चारचाकी वाहनांकरीता पार्किंग व्यवस्था**
  २) माझे पार्किंग
  ३) केंद्रले पार्किंग
  ४) चौगुले पार्किंग
  ५) खड्डा पार्किंग
- **दुचाकी वाहनांकरीता पार्किंग व्यवस्था**
  १) संगमवाडी रोड, नदीपात्रालगत
  २) लहुजी वस्तात साळवे स्मारका शेजारी
  ३) कार्यक्रम ठिकाणाचे विरुध्द बाजुस, नदीपात्रालगत **(पोलीस पार्किंग)**

वरील प्रमाणे पार्किंगची व्यवस्था केली असून कार्यक्रम / सभेकरीता येणाऱ्या नागरिकांचे सोयीकरीता ठिक-ठिकाणी पार्किंगबाबतचे दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी आपली वाहने वर नमुद पार्किंगचे ठिकाणीच पार्क करुन वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबधितांना.**